ePaper

**रिफायनरी प्रकल्प होऊ देणार नाही, संपूर्ण महाराष्ट्र बारसूत उतरेल : उद्धव ठाकरे**



वर्ष - 7 । अंक -11 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- अजित पवार नाराज असल्याची चर्चा?
- सुप्रिया सुळे यांना सर्वोत्कृष्ट खासदार पुरस्कार!

www.mahaenews.com | रविवार, दि. 7 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भाजपाचा संघटनात्मक 'संवाद'!

## » प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंचा आज दौरा : प्रदेश कार्यकारिणीच्या नियुक्तीनंतर कुरबुरी?

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पार्टीची प्रदेश कार्यकारिणी जाहीर झाली. या कार्यकारिणीमध्ये शहरातील नेत्यांना झुकते माप देण्यात आले. त्यानंतर प्रथमच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे पिंपरी-चिंचवडमध्ये दौरा करीत आहेत. शहरातील संघटनात्मक आढावा आणि 'कार्यकर्ता संवाद' मेळावा आज दि. ७ मे रोजी होत होणार असून, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना ते मार्गदर्शन करणार आहेत**



भाजपाची राज्य कार्यकारिणी नुकतीच (ता.३) जाहीर करण्यात आली आहे. उपाध्यक्ष, सरचिटणीस यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये काही पदाधिकाऱ्यांना या कार्यकारिणीतून वगळण्यात आले आहे, तर काहींना बढती देण्यात आली आहे.

राज्यातील राजकीय परिस्थिती आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची शहरातील ताकद पाहता आगामी महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी भाजपाने आतापासूनच सुरूवात केली आहे. शिरुर आणि मावळ लोकसभा मतदार संघात भाजपाची ताकद असली, तरी दोन्ही जागांवर पक्षाचा खासदार नाही. त्यामुळे सुरूवातीला भाजपाचे लोकसभा प्रवास योजनेंतर्गत शिरुरमध्ये मोर्चेबांधणी केली आहे. मावळचे खासदार श्रीरंग बारणे शिंदे गटाच्या माध्यमातून भाजपा- सेना महायुतीच्या एकत्रित ताकदीने 'हॅट्रिक' करण्याच्या तयारीत आहेत.

दुसरीकडे, भोसरी आणि चिंचवडमध्ये पक्षाचे आमदार असले तरी, भाजपा आता पिंपरी विधानसभा मतदार संघावर लक्ष केंद्रीत करणार आहे. तसेच, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात "अब की बार १०० पार" असा नारा स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा महत्वपूर्ण मानला जात आहे.

### निकटवर्तीयांनाच कार्यकारिणीत संधी?

» दरम्यान, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निकटच्या वर्तुळातील व्यक्तींनाच प्राधान्याने नव्या प्रदेश कार्यकारिणीत स्थान देण्यात आल्याची भाजपामध्ये चर्चा आहे. त्यातून जुन्याच नाही, तर नव्याने पक्षात आलेल्यांतही नाराजीचा सूर आहे. दरम्यान, आता नव्या जिल्हाध्यक्षांची निवड १५ मे पूर्वी केली जाणार आहेत. त्यासाठी, तरी विद्यमान जिल्हाध्यक्षांना पक्ष विचारात घेणार का? अशी चर्चा आहे. शहरातील तीन विधानसभा मतदारसंघापैकी भोसरी आणि चिंचवडमध्ये पक्षाचे आमदार आहेत. सध्या अध्यक्षपद भोसरीत आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बदलांमध्ये शहराध्यक्षपदाची संधी नव्या चेहऱ्याला मिळणार की, आमदार लांडगे यांना मुदतवाढ मिळणार? याकडे स्थानिक कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

# दस्तनोंदणी पुन्हा कायद्याच्या कचाट्यात?

## » विधी विभागाची परवानगी : नोंदणी व मुद्रांक विभाग सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तुकडेबंदीला विरोध करणारी शासनाची पुनर्विचार याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळली आहे. त्यामुळे दुय्यम निबंधक यांनी कोणताही दस्तनोंदणी करण्यास आला असता नाकारु नये, असा निकाल कायम राहिला आहे. या निकालाच्या विरोधात नोंदणी व मुद्रांक विभाग सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहे. त्यासाठी राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाने परवानगी दिली आहे.**



औरंगाबाद खंडपीठाने साधी पुनर्विचार याचिका फेटाळत सर्वोच्च न्यायालयात जाण्यासाठी चार आठवड्यांचा वेळ दिला आहे. याबाबतचे आदेश १३ एप्रिल रोजी न्यायालयाने दिले. हा निकाल नोंदणी व मुद्रांक विभागाच्या विरोधात गेल्याने तसेच या अधिकृत बांधकामांमधील सदनिका व बेकायदा प्लॉटिंगची दस्तनोंदणी होणार असल्याने मंत्रालय स्तरावर याची गांभीयनि दखल घेतली आहे. नोंदणी व मुद्रांक विभागाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी शासनाकडे विचारणा केली होती. त्यास शासनाने मान्यता दिली आहे. या निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात येणार असून, यामध्ये पहिले प्राधान्य या निकालास स्थगिती आदेश घेण्यासाठी असणार असल्याचे नोंदणी अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. नोंदणी महानिरीक्षक यांनी महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ चे नियम ४४ (१ ) (ळ) च्या आधारे सर्व जिल्हा निबंधक, दुय्यम निबंधक यांना आदेश दिले की, महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध असल्यामुळे खरेदीखत नोंदण्यापूर्वी मंजूर केलेले आऊट खरेदी दस्तासोबत जोडलेला नसल्यास नोंदणी करू नये. औरंगाबाद येथील प्लॉटिंगचे व्यवसाय करणाऱ्यांनी नोंदणी महानिरीक्षक यांनी २०२१ मध्ये काढलेल्या या परिपत्रकास औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले होते. त्यावर निकाल देताना न्यायालयाने दुय्यम निबंधक यांची कृती नोंदणी कायद्यातील कलम ३४ व ३५ विरुद्ध असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. त्यामुळे दि. १२ जुलै २०२१ चे परिपत्रक व महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ चे नियम ४४ (१) (ळ) रद्द ठरविले आहे. तसेच दुय्यम निबंधकांनी दस्तनोंदणी करण्यास नाकारू नये, असा निकाल दिला होता. यावर शासनाने औरंगाबाद खंडपीठाकडे पुनर्विचार याचिका दाखल केली होती.

> "तुकडेबंदीबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात येणार आहे. यासाठी शासनाच्या विधी व न्याय विभागाने परवानगी दिली आहे.
> –हिरालाल सोनवणे, नोंदणी महानिरीक्षक.

# अजित पवार नाराज असल्याची चर्चा?

## बैठकीत काय झालं ते रोहित पवारांनी सांगितलं

।पुणे।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**शरद पवार यांनी अखेर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा मागे घेतला. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेली अस्वस्थता दूर झाली आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादीतील घडामोडींबद्दल रोहित पवार यांना पुण्यात पत्रकारांनी प्रश्न विचारण्यात आले. त्यावर त्यांनी उत्तरं दिली..**



महाराष्ट्राच्या लोकांच्या इच्छेनुसार पवार साहेबांनी माघार घेऊन पुढे आता लढायचं आणि कार्यकर्त्यांना घेऊन लढायचं. आणि आम्ही सर्वजण कार्यकर्ते आहोत. नेहमीच त्यांच्या विचाराने चालणारी लोक आहोत. प्रत्येक शहरांमध्ये प्रत्येक तालुक्यात प्रत्येक जिल्ह्यात तिथे असलेल्या सर्व कार्यकर्ते पदाधिकारी पवार साहेबांचं अतिशय प्रेमाने सर्व कार्यकर्त्यांनी स्वागत केलं आणि हीच खरी पवार साहेबांची ताकद आहे, असं रोहित पवार म्हणाले.

पवारांनी राजीनामा मागे घेतला नसता तर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडेल अशी भीती होती? अशी चर्चा सुरू होती. यावर रोहित पवार यांनी उत्तर दिलं. 'असं कोण म्हणलं? कुठे तरी काही लोकांनी लिहिलंय, व्हाट्सअॅपवर स्प्रेड झालं आहे. काही लोक उगाचच अशा पद्धतीने चर्चा करत आहेत. तुम्ही बघितलं तर कमिटीत सगळीच लोक होती. आणि निवड समितीचा निर्णय एकमताने झाला आणि पवार साहेबांनी माघार घेतली म्हणून अफवांवरती विश्वास ठेवणे हे योग्य नाही', असं रोहित पवार म्हणाले.

शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन राजीनामा मागे घेतल्याचं जाहीर केलं. पण यावेळी अजित पवार त्यांच्यासोबत दिसले नाही. शरद पवारांनीही पत्रकारांना उत्तर दिलं. पण अजूनही अजित पवार हे नाराज असल्याच्या चर्चा आहे. त्यावर रोहित पवारांनी उत्तर दिलं आहे. तुम्ही जर बघितलं तर समितीमध्ये स्वतः दादा होते. मी जेव्हा सिल्व्हर ओकला उपस्थित होतो, तेव्हा पवार साहेब तिथे उपस्थित होते. आणि जेव्हा सर्व नेते आले. तेव्हा पाहिले तिथे येणारे दादाचं तिथे होते. आणि दादांनी स्वतः तिथे पवार साहेबांसोबत चर्चा केली. समितीमध्ये काय आणि कसे निर्णय झाले, याची माहिती दिली. आणि त्या बैठकीत ठरले की ठराविकच लोक पत्रकार परिषदेला जातील. आणि म्हणून ठराविकच लोक पत्रकार परिषदेला होते. नाराजी असं काय तुम्हाला जे वाटतं असं काही नाही, असं रोहित पवार यांनी स्पष्ट केलं.

दादा माझ्या मतदारसंघांमध्ये येत जात असतात. माझ्या मतदारसंघांमध्ये अनेक कार्यक्रम असतात. तसेच तुम्ही जर बघितलं तर बऱ्याच ठिकाणी दादा हे स्वतःहून तिथे जात असतात. त्यामुळे दादा शेवटी विरोधी पक्षनेते आहेत. आमचे नेते आहेत आणि या महाराष्ट्रामध्ये कुठल्याही कानाकोपऱ्यामध्ये ते कधीही जाऊ शकतात, असं रोहित पवार म्हणाले. अजित पवार हे रोहित पवारांच्या मतदारसंघात दौऱ्यावर जाणार आहेत. त्यावर रोहित पवारांनी स्पष्ट केलं. बैठकीमध्ये अशी काही चर्चा झाली नाही. पण बैठक जेव्हा होत असते तेव्हा चर्चा तर होणारच.

### जयंत पाटील भाजपमध्ये जाणार?

**» जयंत पाटील यांची भाजप सोबत जाण्याची इच्छा आहे? असा प्रश्न रोहित पवार यांना विचारण्यात आला. जयंत पाटील असे कुठे बोलले? अशी निव्वळ चर्चा आहे आणि चर्चाच राहणार आहे. एकनाथ शिंदेंचा जो गट फुटला आहे. लोकांचं जनमत शिंदे गटाच्या आणि भाजपच्या विरोधात आहे. आजपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात अशी कुठेही प्रथा नव्हती, एखादा पक्ष फोडून सत्ता स्थापन करायची. ही सर्व परिस्थिती पाहताना भाजपच अस्वस्थ झालेला आहे. त्यांना वाटू लागले की आपल्याला येणाऱ्या निवडणुकांमध्ये पराजयला समोर जावं लागेल, याची भीती भाजपला आहे. म्हणून त्यांनीच कादचित ह्या राजकीय पुड्या माध्यमांमध्ये सोडल्या असाव्यात. त्यामुळे अशा चर्चा होत आहेत, असं म्हणत रोहित पवारांनी भाजपवर निशाणा साधला.**

# सुप्रिया सुळे यांना सर्वोत्कृष्ट खासदार पुरस्कार!

## महाराष्ट्राचा आवाज दिल्लीत बुलंद!

।पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आपल्या विषयाची मुद्देसूद मांडणी, त्याचा सखोल अभ्यास, नेमकेपणाने बोलणे, संसदेचा पुरेपूर मान राखत योग्य तेच बोलणे, जास्तीत जास्त उपस्थिती, चर्चासत्रात सहभागी होणे इतकेच नाही तर एखाद्या लोकोपयोगी विषयाचा परिपूर्ण अभ्यास करून तो खासगी विधेयकाच्या रूपाने पटलावर मांडण्यातही खासदार सुप्रियाई सुळे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे याच कारणांमुळे पुन्हा एकदा त्यांनी देशातील सर्वोत्कृष्ट खासदार होण्याचा मान मिळवला आहे.**



संसदेच्या चर्चासत्रातील सहभाग... उपस्थिती... विचारलेले प्रश्न आणि मांडलेली खासगी विधेयके... यातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पुन्हा एकदा सर्वोत्कृष्ट खासदारकीच्या मानचिन्हावर मोहोर उमटवली आहे. आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीने व नेमकेपणामुळे पुन्हा एकदा खासदार सुप्रिया सुळे यांनी देशाच्या संसदेत महाराष्ट्राचा आवाज बुलंद केलाय.

देशाचे सर्वोच्च सभागृह समजल्या जाणाऱ्या संसदेतील खासदारांच्या प्रभावी कामगिरीचा आढावा घेणाऱ्या प्रख्यात इ-मॅगेझिनचा एप्रिल महिन्याचा अहवाल नुकताच जाहीर झाला असून या अहवालात संसदेतील नोंदीनुसार खासदार सुप्रिया सुळे या अव्वल ठरल्या आहेत. १७ व्या लोकसभेचा या अहवालात २०१९ पासून आतापर्यंत देशभरातील खासदारांनी संसदेतील किती चर्चासत्रात भाग घेतला? त्यांनी किती खासगी विधेयके मांडली? प्रश्न किती विचारले आणि त्यांची सभागृहात उपस्थिती किती होती? अशी सर्वांगीण अभ्यासपूर्ण पाहणी करण्यात आली आहे.

या पाहणीमध्ये खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सर्वाधिक ७११ गुणांक मिळवून देशातील सर्वोत्कृष्ट खासदार होण्याचा मान मिळवला आहे. संसदेच्या आजवरच्या एकूण २२९ चर्चासत्रात सहभागी होत त्यांनी तब्बल ५४६ प्रश्न विचारले आहेत. इतकेच नाही, तर त्यांनी या कामगिरीमध्ये १३ खासगी विधेयके मांडत देशातील सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना प्रथमच पटलावर आणत त्यावर कायदा व्हावा अशा सूचनाही मांडल्या आहेत.

संसदेत खासदार सुप्रियाताई सुळे यांची ९३ टक्के उपस्थिती आहे. याची टक्केवारी पाहता राष्ट्रीय पातळीवर ७९ टक्के तर राज्य पातळीवर ७४ टक्के इतकी होते. चर्चासत्रात सहभागाची टक्केवारी राष्ट्रीय पातळीवर ४१.५ तर राज्य पातळीवर ५१.३, खासगी विधेयके राष्ट्रीय पातळीवर १.२ तर राज्य पातळीवर २.४ इतकी आहे. संसदेत त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची सरासरी राष्ट्रीय पातळीवर १७६ असून राज्य पातळीवर ती तब्बल ३२७ इतकी असल्याचे ई-मॅगेझिनच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### पाकच्या गुप्तचर यंत्रणेशी संबंधित महिलेच्या संपर्कात

**» आपल्या मतदार संघातील सर्वसामान्य जनतेचा आवाज देशाच्या सर्वोच्च सभागृहापर्यंत पोहोचवणे, त्यांच्या समस्या पटलावर मांडणे, त्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, स्थानिक पातळीपासून मंत्रालयापर्यंत आणि प्रत्यक्ष भेटीपासून संसदेत आवाज उठवण्यापर्यंत त्याचा पाठपुरावा करणे यासाठी जशा खासदार सुप्रिया सुळे या ओळखल्या जातात.**

# मावळातील कासारसाई धरणात बुडून दहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

मावळातील कासारसाई धरणात बुडून दहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली.आदर्श संतोष गायकवाड (वय १०,रा. वैदुवाडी, हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. आदर्श हा कासारसाई धरण परिसरात मावशी पल्लवी साळवे हिच्यासह आला होता.

पल्लवी आणि आदर्श पाण्यात खेळत होते. त्या वेळी पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने आदर्श बुडाला. आदर्श बुडाल्याचे लक्षात आल्यानंतर पल्लवीने या घटनेची माहिती शिरगाव परंदवडी पोलीस चौकीला दिली. पोलीस उपनिरीक्षक बी. सी. गावित, हवालदार जॉन पठारे, पोलीस नाईक पी. एम. खेडकर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

मावळातील वन्यजीव रक्षक मावळ संस्था आणि शिवदुर्ग मित्र



लोणावळा या संस्थेतील जीवरक्षक निलेश गराडे, भास्कर माळी, अविनाश कार्ले, विनय सावंत, अनिश गराडे, राजाराम केदारी आदींनी शोधमोहीम राबविली. पाण्यात बुडालेल्या आदर्शला बाहेर काढण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.

**पाण्याचा अंदाज न आल्याने मुलगा बुडाला**

पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला, अशी माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन येथून पीएसआय गावित, पोलीस हवालदार जॉन पठारे, पोलीस नाईक खेडकर हे तत्काळ घटनास्थळी दाखल झाले.

# मराठा आरक्षणासाठी 'एल्गार'!

## » सुभाष जावळे-पाटील : येत्या 14 मेपासून पालकमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन

| पिंपरी | | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**मराठा समाजाची सरकारकडून घोर निराशा झाली आहे. राज्य शासनाने मराठा समाजाच्या आरक्षणासह अन्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा १४ मेनंतर पुन्हा आंदोलन करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात १५ मे पासून पालकमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर गोंधळ घातला जाईल. तरीही दुर्लक्ष केले, तर केंद्र आणि राज्यातील मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू दिले जाणार नाही. त्यांना काळे झेंडे दाखवले जातील. तरीही सरकार जागे झाले नाही तर १ जूनपासून मुख्यमंत्री कार्यालयासमोर आरक्षण समितीच्या वतीने प्राणांतिक उपोषण करण्यात येईल असा अल्टिमेटम मराठा आरक्षण समन्वय समितीचे अध्यक्ष सुभाष जावळे-पाटील यांनी राज्य सरकारला दिला.**



मराठा आरक्षण एल्गार परिषदेच्या वतीने आकुर्डी येथील श्रमशक्ती भवन येथे शनिवारी आकुर्डी, मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षण एल्गार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत जावळे पाटील बोलत होते. यावेळी धनाजी येळकर पाटील संस्थापक अध्यक्ष छावा मराठा युवा महासंघ, सुधाकरराव माने संस्थापक अध्यक्ष संभाजी सेना, पी. आर. देशमुख प्रदेशाध्यक्ष भारतीय मराठा महासंघ, रामेश्वर शिंदे प्रदेशाध्यक्ष संभाजी सेना, प्रविण कदम शहराध्यक्ष संभाजी ब्रिगेड, हेमलता लांडे पाटील छावा मराठा युवा महासंघ, देविदास रांजळे पाटील सरचिटणीस समन्वय समिती मुंबई, सखाराम काळे पाटील समन्वयक क्रांती मोर्चा छत्रपती संभाजी नगर, संजय जाधव प्रदेश उपाध्यक्ष छावा मराठा युवा महासंघ, प्रदीप पाटील हुंबाड समन्वयक नांदेड पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या परिषदेमध्ये काही प्रमुख मागण्या सर्वानुमते मान्य करण्यात आल्या त्या मराठा समाजाला कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता कायदेशीर टिकणारे आरक्षण देऊन मराठा आरक्षणाचा प्रश्न तात्काळ सोडवावा. आरक्षण मिळत नाही तोपर्यंत नोकर भरती करू नये. अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांच्या स्मारकाचे काम तात्काळ सुरू करावे. पंजाबराव देशमुख निर्वाण भत्ता व वस्तीगृहाचा लाभ सरसकट मराठा विद्यार्थ्यांना मिळावा. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातून मिळणाऱ्या कर्ज प्रकरणासाठीच्या जाचक अटी रद्द करण्यात याव्यात. कोपर्डी प्रकरणातील आरोपींना झालेल्या फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी तात्काळ करावी. बार्टीच्या धरतीवर सारथी सक्षम करावी. मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत आदी मागण्या एल्गार परिषदेत करण्यात आल्या.

> **"शासनाने कोणत्या ही अन्य समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे. कायद्याच्या चौकटीत राहून हे आरक्षण देता येईल. आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनात जवळपास पन्नास जणांनी बलिदान दिले आहे, ते व्यर्थ जाणार नाही. आता आरक्षण मिळेपर्यंत शासनाला स्वस्थ बसू दिले जाणार नाही. 14 मे रोजी छत्रपती संभाजी महाराजांची जयंती आहे. त्यानंतर मराठा समाजाचे आंदोलन सुरू करण्यात येईल.**
> **- सुभाष जावळे-पाटील, अध्यक्ष, मराठा आरक्षण समन्वय समिती.**

# विधानसभा सदस्य राजमुद्रा स्टिकरचा गैरवापर!

## » आम आदमी पार्टीकडून कारवाईची मागणी : पोलीस आयुक्त चौबे यांना निवेदन

|पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी: पिंपरी-चिंचवड शहरात वाहनांवर विनापरवाना आमदार लोगो लावले जात आहेत. त्यामुळे विनापरवाना आमदार लोगो असलेले वाहन आणि वाहन मालकांवर फौजदारी कारवाई करावी करण्याची मागणी आम आदमी पार्टीने पोलिसांकडे केली आहे..**



कारवाई आणि फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आम आदमी पार्टीचे सदस्य रविराज काळे यांनी केली आहे.

दरम्यान, आमदाराशी जवळीक आहे किंवा आमदार आपल्या खिशातच आहे, हे दाखविण्यासाठी हे स्टिकर मिळविण्यासाठी आमदारांचे नातेवाइक, मित्र आणि जवळचे कार्यकर्ते यांचा आटापिटा चालला असतो. आमदारांनीही अशांना नाखूष न करण्याचे धोरण पत्करलेले दिसत आहे.

### नियमावली काय आहे?

» कायद्यानुसार राष्ट्रपती, राज्यपाल, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या वाहनांवर नंबरप्लेटच्या ठिकाणीच राष्ट्रीय चिन्हाचा वापर करण्यास परवानगी आहे. केंद्रीय मंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री, लष्कराचे विशिष्ट अधिकारी आणि खासदार यांना अधिवेशन काळात अथवा शासकीय दौऱ्यात विशेषाधिकारात लाल, अंबर दिव्यांसोबत राजमुद्रेचे निर्धारित स्टिकर वापरण्याची परवानगी आहे. या व्यतिरिक्त कोणीही लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे नेते, माजी मंत्री, माजी न्यायाधीश अथवा उद्योजकांना वाहनांवर राजमुद्रा वापरता येत नाही. केंद्र व राज्य सरकारचे मंत्री, शासकीय उच्चपदस्थ अधिकारी, लोकप्रतिनिधींना ओळखपत्र, लेटरहेडवर राजमुद्रेचा वापर करता येतो. मात्र, शासनाने ठरवून दिलेल्या मुद्रणालयातूनच ते घेतलेले असावे.

याबाबाब पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, शहरात आमदारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. शहरातील नागरिकांना आणि आम्हा विद्यार्थ्यांना खरे आमदार कोण हे ओळखणे अवघड जात आहे. गाडीवर आमदार असे स्टिकर आणि काळ्या काचा लावून शेकडो गाड्या पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या थाटात फिरत आहेत. परंतु त्यांच्यावर कारवाई होताना दिसत नाही.

शहरात असणारे लोकसभा सदस्य, राज्यसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य, विधानसभा सदस्य यांच्या अधिकृत वाहनांचे नंबर पिंपरी-चिंचवडकरांसाठी जाहीर करावेत. जेणेकरून खऱ्या आमदारांची गाडी ओळखणे सोपे होईल. ज्या खोट्या आमदारांनी गाडीवर अनधिकृत स्टिकर लावले गेले आहे अशांवर दंडात्मक

त्यामुळेच हे स्टिकर कोणालाही मिळत आहे. हिरव्या रंगाचे हे स्टिकर असून त्यावर विधानसभा सदस्य, असे लिहिलेले असते. या स्टिकरवर तीन सिंहांची राजमुद्रा असते. विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांच्या गाड्यांना असे स्टिकर लावले जाणे अपेक्षित असताना ते उटसूट कोणीही लावत असल्याने मुंबईत नेमके किती आमदार आहेत ? किंवा आमदाराच्या किती गाड्या आहेत, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडू लागला आहे. त्यामुळे आम आदमी पक्षाच्या वतीने हा सवाल उपस्थित केला जात आहे.

# लग्न बाजारातील घोडे वठणीवर आणायला हवे




लग्न दोन कुटुंबातील स्नेहबंध असतात,काही नाती या निमित्ताने नव्याने निर्माण होतात आणि मर्यादित आकाश असणाऱ्यांना नात्यांचे मोकळे आकाश मिळते. नात्यांच्या विस्तारलेल्या पटावरून त्या त्या परिसरातील चालीरीती,संस्कृती समजून विचारांची देवाणघेवाण व्हायला सुरुवात होते. दोन्ही कडील कुटुंबाला स्नेहबंधासाठी नवी दालने उघडी होत जातात. अलीकडे या सगळ्यांना बाजूला सारत वर पक्षातील मंडळींचा उच्छाद एवढा वाढला आहे की त्यापुढे वधूपक्ष मजबुरीने नाक घासताना दिसतात. लग्न संबंध जुळविताना जे लोक मध्यस्त असतात ,त्यांच्यात ज्या बाबी ठरल्या नाहीत त्या वेळेवर उकरून काढीत वर आणि त्याचे मित्र वधूच्या नातेवाईकांना ज्या पद्धतीने अपमानित करतात त्यावरून भावी काळात यांची नाती कशी असतील याचा अंदाज येतो. अलीकडे ज्या बातम्या कानावर येतात त्यात कुठे वराला मारहाण होते तर कुठे लग्न चार तास उशिरा लागले म्हणून मुलगी दुसऱ्याच मुळाशी लग्नगाठ बांधून मोकळी होते.

वर पक्षाची दांडगाई आणि बेशिस्त बघून नाईलाजाने असे म्हणावे लागते की अश्या आणखी काही घटना प्रत्येक तालुक्यात घडायला हव्यात. लग्नाची तिथी काढताना वेळ अगदी तास आणि मिनिटे या क्रमाने काढला जातो मात्र तो पाळण्याची जबाबदारी जणू आपली नाहीच अश्या बेताने नवरा मुलगा आणि त्याचे मित्र वागतात तेव्हा मुलीच्या पित्याच्या डोळ्यात अश्रू आणि चेहरा केविलवाणा झालेला असतो कारण मुलगी बोहल्यावर येऊन बसलेली असते ,नवरदेव मात्र वेळ टळून गेली तरी मंडपात यायचे नाव घेत नाही. लग्न ठरलेल्या वेळेवर लागावे असे दुर्दैवाने ८० टक्के लोकांना वाटत नाही त्याचे भयंकर मनस्ताप उपस्थित पाहुण्यांना भोगावे लागतात. लग्नाची दाट तिथी असलेल्या दिवशी अनेकांना एकाच दिवशी अनेक लग्नांना हजेरी लावायची असते पण एकही लग्न वेळेवर लागत नसल्याने ते शक्य होत नाही. वेळेवर लग्न लागत



नसतील तर मुहूर्त काढताना तास,मिनिटे आणि सेकंदाचा विचार तरी का करावा ?

मागच्या वर्षी बुलडाणा जिल्ह्यात एका नवरदेवाने वेळेच्या बाबतीत अति केली,दुपारी चार ही लग्नाची वेळ टळून पुढे चार तास उलटून गेले तरी नवरदेव मित्रांसोबत डीजे लावून नाचत असल्याचे लक्षात आल्यावर वधूकडील लोकांनी तात्काळ निर्णय घेत मांडवात हजर असलेला मुलगा बोहल्यावर उभा करीत त्याचे लग्न लावून टाकले. हा नवरदेव आपल्या दारुड्या मित्रासह बसला नाचत. दुसऱ्या एका घटनेत ऐनवेळी रुसून बसलेल्या नवरदेवाने चक्क बोलेरो गाडीची मागणी केली. आता वेळेवर वधूपिता बोलेरो गाडी कुठून आणणार ? मोठा पेच पडला ,शेवटी काही नातेवाईकांनी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला परंतु नवरदेव ठरला अदृश्य शिंगे असलेला एक दिवसाचा पहेलवान, कुणालाही ऐकत नाही,कुणाचा सन्मान ठेवत नाही हे लक्षात आल्यावर शेवटी नातेवाईकांनी त्याला एवढा चोप दिला दिला की कपडे फाटलेल्या नवरदेवाला रस्ता दिसेल तिकडे पळण्याची पाळी आली.

स्वतःची ऐपत नसताना लग्नात मात्र वधू पक्षाला अव्वाच्या सव्वा मागण्या करणे, लग्नात कोणते पदार्थ असले पाहिजेत याच यादी सुद्धा अलीकडे नवरदेव ठरवू लागले आहेत. काही जण एवढे बेशरम असतात की लग्नाची पंगत आणि स्वतःच्या गावातला स्वागत समारंभाचा खर्चही वाढू पित्याच्या खिश्यावर टाकायला मागेपुढे बघत नाहीत. अनेक नोकरदार मुले तर मुलीच्या पित्याने गादी ,पलंग दिला नाही तर त्यासाठी पण रुसून बसतात. मध्यस्थांच्या बैठकीत हुंडा तर हमखास ठरवला जातो,आम्ही हुंडा घेत नाही म्हणणारे अतिशय निर्लज्जपणे मुलीच्या पित्याकडे मुलीला किती तोळे सोने देणार असा भिकारी प्रश्न करतात आणि वरून हुंडा घेत नसल्याच्या फुशारक्या मारतात.

काही महाभाग तर सगळा व्यवहार गुपचूप करून वरून आम्ही आदर्श विवाह करीत असल्याचा देखावा निर्माण करतात. लग्न व्यवहारातले असे पाखंडी लोक समाजाने उघडे पडायला हवेत.

लग्नाचा खरा अर्थ अश्या लोकांनी कधीच बाजूला फेकून घोडेबाजार सुरु केला आहे. मुलीच्या सुरक्षेपोटी पिताही संकल्पाच्या नावावर हुंडा द्यायला स्वतःहून पुढे येत आहे ,हावरट मुले शिक्षित आणि घरी श्रीमंत असूनही मुलीच्या पित्याला आणखी कसे खड्डयात टाकले जाईल याचे नियोजन करीत असतात.

जो तरुण हुंडा उघड किंवा इतर कोणत्याही रूपाने स्वीकारून लग्न करीत असेल तर मुलींनो त्यावर कधीच विश्वास नका ठेवू,असली मतलबी माणसे कधीच कुणाचे होत नसतात. ज्याने स्वतःच्या लग्नातही व्यवहार सोडला नाही तो जीवनात व्यवहार कसा सोडेल ? नाती,माणुसकी,सामाजिक भान हे अश्या लोकांसाठी केवळ पुस्तकी शब्द असतात , पुढे हेच लोक पराकोटीचे पाखंडी बनतात आणि सामाजिक दायित्वाच्या गप्पा मारताना दिसतात. घरातील कुण्या म्हाताऱ्याला पाणी न पाजता बस स्टॅण्डवर असे लोक पानेरी लावून स्वतःची पाठ थोपटून घेत असतात.

## संपादकीय »

### भिकेची भूक!

***भारताची खनिज तेल आयात विक्रमी ८७ टक्क्यांवर गेल्याची बातमी येत असताना आपल्या कोकणातील बारसू येथे तेल शुद्धीकरण प्रकल्पावरून जे झाले ते एके काळच्या सर्वश्रीमंत महाराष्ट्राची भिकेची भूक किती अचाट वाढलेली आहे, हे दर्शवते.***

भारताची खनिज तेल आयात विक्रमी ८७ टक्क्यांवर गेल्याची बातमी येत असताना आपल्या कोकणातील बारसू येथे तेल शुद्धीकरण प्रकल्पावरून जे झाले ते एके काळच्या सर्वश्रीमंत महाराष्ट्राची भिकेची भूक किती अचाट वाढलेली आहे, हे दर्शवते. मुळात हा प्रकल्प नाणार येथे येणार होता. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी प्रयत्न केले. पण तत्कालीन मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेची मर्जी राखण्यासाठी त्यांनी या प्रकल्पाचा बळी दिला. नंतर राजकारणाने जे वळण घेतले त्यामुळे भाजपने मित्र तर गमावलाच पण महाराष्ट्राचा एक महत्त्वाचा प्रकल्पही लटकला. तेलही गेले, तूप तर गेलेच, पण धुपाटणे मात्र राज्याच्या हाती आले. नंतरच्या उद्धव ठाकरे यांचा मुख्यमंत्रीपदाचा बराचसा काळ करोना-टाळेबंदीत गेला.

**कर्नाटक निवडणुकीत काँग्रेसने बजरंग दलावरील बंदीची भाषा केली आणि भाजपने त्यामुळे बजरंगबली भीमरूपी मारुतरायाचा अपमान झाल्याचे प्रत्युत्तर दिले. यातून या दोन्ही पक्षांची आणि परिणामी जनतेचीच एक प्रकारे अपहरिहार्यता दिसून आली. वास्तविक ही अशी काही मागणी केली की भाजप त्यास कसे फिरवेल हे एव्हाना काँग्रेसजनांस कळायला हवे.**

## राजकीय कलगीतुरे काय साधणार?



कारण हे असे काही श्रद्धेय मुद्द्यांस मैदानात आणल्याखेरीज भाजपस पर्याय नाही, याची तरी जाण त्या पक्षास आव्हान देऊ पाहणाऱ्यांस हवी. पण तिचा अभाव असल्याने नको तो मुद्दा उपस्थित करून काँग्रेसने निवडणुकीच्या तोंडावर भाजपच्या हाती एक आयतेच कोलीत दिले यात शंका नाही. वास्तविक काँग्रेस या मुद्द्यास हात घालू पाहात असताना १ मेच्या कामगार दिनाच्या मुहूर्तावर उघड झालेला देशातील बेरोजगारीबाबतचा तपशील हा सामान्य नागरिकांच्या भवितव्यासाठी अधिक महत्त्वाचा आहे. तथापि अलीकडच्या काळात निवडणुकांत सामान्यांचे हित आदी मुद्दे तसे ‘ऑप्शन’ला टाकण्याची प्रथा पडलेली असल्याने काँग्रेस आणि सत्ताधारी भाजप या दोहोंनी जे केले ते तसे सद्य:स्थितीस साजेसेच म्हणायचे. एका बाजूला बेरोजगारीसारख्या महत्त्वाच्या तपशिलांकडे काणाडोळा आणि दुसरीकडे ‘बघा..वस्तू व सेवा कर उत्पन्न कसे वाढले’ वगैरे ‘यशा’चे निवडक डिंडिम असे हे सध्याचे चित्र आहे. बरे, एकंदर नागरिकांच्या अर्थजाणिवा यथातथाच असल्याने चर्चा आर्थिक मुद्द्यांपेक्षा कोणत्या ईश्वरी अवताराचा अपमान कोणी केला; याचीच. अशा परिस्थितीत या वातावरणीय बदलांकडे दुर्लक्ष करून मुख्य आर्थिक मुद्द्यांची चर्चा करणे आवश्यक ठरते.

सर्वप्रथम १ मे रोजी विक्रमी नोंदवल्या गेलेल्या वस्तू-सेवा कराविषयी. गेल्या महिन्यात संपूर्ण देशातून या करापोटी १ लाख ८७ हजार कोटी रु. इतकी रक्कम जमा झाली. हा विक्रम. त्यासाठी सर्व संबंधित अभिनंदनास पात्र ठरतात. गतवर्षीच्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत ही वाढ १२ टक्के आहे, ही बाब खरोखरच कौतुकाची. तथापि हे कौतुक करताना दुर्लक्ष करू नये असा मुद्दा म्हणजे हा महिना. ही कर रक्कम सरकारी तिजोरीत एप्रिल महिन्यात भरली गेली. पण ती आकारली गेलेली होती त्याआधीच्या महिन्यासाठी. म्हणजे मार्च महिन्यासाठी. या महिन्याने अर्थवर्षाचा शेवट होतो. त्यामुळे दरवर्षीच नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या महिन्यात, म्हणजे एप्रिलमध्ये, करभरणा आधीच्या महिन्यांच्या तुलनेत जास्त होतो. हे दरवर्षीच होते. तेव्हा खुद्द पंतप्रधानांनी या विक्रमी कर संकलनाच्या जाहीर कौतुकाची त्वरा दाखवली असली तरी त्यामागील वास्तव हे असे आहे. वस्तू-सेवा कर हा प्रत्यक्ष कर नाही. अप्रत्यक्ष आहे. तो वस्तू आणि सेवांवर लावला जातो. हे अशासाठी लक्षात घ्यावयाचे कारण ज्या ज्या वेळी वस्तू-सेवा महागतात; त्या त्या वेळी वस्तू-सेवा कराची वसुली आपोआप वाढते. तेव्हा या विक्रमी कर संकलनाच्या श्रेयाचा मोठा वाटा त्या काळात वाढलेल्या महागाईलाही द्यायला हवा. याचा अर्थ या कर संकलनात १२ टक्क्यांची झालेली वाढ कौतुकास्पद नाही असे अजिबात नाही. ही घटना स्वागतार्ह खरीच.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ...तर महाराष्ट्र पेटवू!

## उद्धव ठाकरे यांचा इशारा: भरत गोगावलेंना बालेकिल्ल्यात उद्धव ठाकरेंनी केलं लक्ष्य

। राजापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रस्तावित बारसू तेलशुद्धीकरण प्रकल्पाच्या अनुषंगाने या परिसरातील कातळशिल्पांची पाहणी केल्यानंतर ठाकरे यांनी धोपेश्वर-गिरमादेवी कोंड येथे ग्रामस्थांशी संवाद साधला. राजापूर तालुक्यातील प्रस्तावित बारसू तेलशुद्धीकरण प्रकल्पाच्या अनुषंगाने या परिसरातील कातळशिल्पांची पाहणी केल्यानंतर ठाकरे यांनी धोपेश्वर-गिरमादेवी कोंड येथे ग्रामस्थांशी संवाद साधला. "बारसूमध्ये निर्मनुष्य जागा आहे, फार नुकसान नाही होणार नाही, हा प्रकल्प आपल्यासाठी महत्त्वाचा आहे, असे दिल्ली आणि आता सत्तेत असलेले सुपारीबाज गद्दार मला म्हणाले होते. त्यामुळे मी या जागेसाठी प्राथमिक पत्र दिले होते. पण, या संदर्भात स्थानिक लोकांशी संवाद साधा. नेमकी परिस्थिती दाखवा, असेही सांगितले होते. समृद्धी महामार्गाच्या वेळीही अशाच प्रकारे तोडगा काढला होता. सरकारला राज्यभरातील पोलीस घेऊन बळजबरी करून प्रकल्प लादता येतो असे वाटत असेल तर राज्यातील जनता घेऊन बारसूत उतरू", असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला..**



शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची महाड येथे सभा पार पडली. या सभेत ठाकरे गटाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. काँग्रेसच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांनी शिवबंधन हाती बांधलं. यावेळी उद्धव ठाकरेंनी शिंदे गटावर जोरदार टीकास्त्र सोडलं आहे. भगव्याला डाग लावणाऱ्यांना गाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

"काहीजणांना माझ्यावर टीका केल्याशिवाय घशाखाली घासच उतरत नाही. माझ्यावर टीका करून त्यांना दोन घास मिळत आहेत. पण, स्नेहलताई आणि कुटुंब काँग्रेसमधून शिवसेनेत आलं आहे. त्यामुळे काहींच्या भुवया उंचवल्या आहेत. तर काही जणांच्या पोटात गोळा आला आहे. कारण, पुढच्या निवडणुकीत शंभर नाहीतर एक लाख टक्के डिपॉझिट जप्त होणार आहे," असे म्हणत उद्धव ठाकरेंनी अप्रत्यक्षपणे शिवसेना ( शिंदे गट ) आमदार भरत गोगावले यांना लक्ष्य केलं.

तळये गावातील पुनर्वसनावरूनही उद्धव ठाकरेंनी शिंदे सरकार आणि भरत गोगावले यांच्यावर हल्लाबोल केला आहे. "मी मुख्यमंत्री असताना तळये गावाच्या पुनर्वसनाचे आदेश दिले होते. पण, अद्याप तेथील १५ लोकांनाच घरे मिळाली, ही माझी माहिती आहे. मात्र, ती चुकीची असेल आणि सगळे त्यांच्या घरी आनंदाने राहत असतील, तर माझ्याएवढा आनंदी कोणी नसेल."

"पण, मुख्यमंत्री किंवा येथील आमदार तळयेमध्ये जात-येत असेल, नुसता खांद्यावर नॅपकिन टाकून... त्या नॅपकिनचा वापर तुम्ही त्याला करायला लावायचा आहे. त्यांना आता घाम फोडायचा आहे की, नॅपकिन सुद्धा कमी पडला पाहिजे. मुख्यमंत्री म्हणून मी अयोग्य होतो, तर गद्दारी केली. मग, अजूनही तळये गावातील लोकांना घरे का मिळाली नाहीत," असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला आहे.

### महाड येथे सभा

महाड येथे स्नेहल जगताप यांच्या पक्षप्रवेश सोहळ्यानिमित्ताने आयोजित सभेतही उद्धव ठाकरे यांनी भाजपवर टीका केली.

### 'खुर्चीचे पाय डगमगत आहेत..'

राज्य सरकारच्या खुर्चीचे पाय डगमगत असल्याचे निरीक्षण उद्धव ठाकरे यांनी यावेळी नोंदवले. ग्रामस्थांच्या भेटीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना ठाकरे यांनी ग्रामस्थांच्या सभेतील मुद्द्यांचा पुनरुच्चार करत सरकारला लक्ष्य केले.

### बारसू प्रकल्पाच्या समर्थनार्थ मोर्चा

**राजापूर तालुक्यातील बारसू येथील प्रस्तावित रिफायनरी प्रकल्पाच्या उभारणीच्या समर्थनार्थ शनिवारी काढण्यात आलेल्या मोर्चाद्वारे प्रकल्प समर्थकांनी शक्तिप्रदर्शन केले. रिफायनरी प्रकल्प उभारणीच्या मागणीचे निवेदन तहसीलदारांना दिले. भाजपचे प्रदेश सचिव खासदार नीलेश राणे, आमदार नितेश राणे, माजी आमदार प्रमोद जठार, भाजपचे सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष राजन तेली, शिवसेना जिल्हा प्रमुख राहुल पंडित, रिफायनरी समर्थन समितीचे नेते हनिफ मुसा काझी, व्यापारी संघाचे अध्यक्ष संदीप मालपेकर इत्यादींनी मोर्चाचे नेतृत्व केले.**

---

# मुंबई-गोवा महामार्गाबाबत राज ठाकरेंची सरकारवर आगपाखड

## कोकणवासियांनाही सुनावले; म्हणाले, "समृद्धी महामार्ग बघा..."

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबईला कोकणाशी जोडणारा अतिमहत्त्वकांक्षी प्रकल्प मुंबई -गोवा महामार्ग गेल्या १० वर्षांहून अधिक काळापासून रखडला आहे. या मार्गावर ठिकठिकाणी लहान लहान कामे झाली आहेत. पंरतु, पूर्णपणे महामार्ग अद्यापही होऊ शकलेला नाही. यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं आहे. रत्नागिरीतील सभेत ते बोलत होते.**



"२००७ साली मुंबई गोवा महामार्गाचे काम सुरू झाले होते. परंतु अजून पूर्ण होत नाहीय. काय करतायत तुमचे लोकप्रतिनिधी? कुठे आहेत तुमचे खासदार? कुठे आहेत आमदार? त्याच त्याच लोकांना तुम्ही सतत निवडून देतायत. त्यामुळे त्यांना काही पडलेलीच नाही. काम केलं काय आणि नाही केलं काय? ही माणसं तुम्हाला निवडून देणारच आहेत. खाचखळगे खड्ड्यातून तुम्ही जाणार. तुमच्याबद्दल आपुलकी शुन्य राहिली आहे लोकांना. तीच गोष्ट बघा, २००७ ला सुरू झालेला प्रकल्प १६ वर्षे झाला काहीच काम झालं नाही. मधले मधले पॅचेस फक्त तयार झाले", असं म्हणत राज ठाकरेंनी संताप व्यक्त केला आहे.

"मी जेव्हा या रस्त्यावरून गेलो मागच्या वेळेला, तेव्हा फडणवीसांना फोन केला की, या रस्त्याचं बघा काहीतरी. तर मला म्हणाले नितीनजींशी बोलून घेता का. म्हटलं बोलतो. मग मी नितीनजींना फोन लावला. मुंबई गोवा रस्त्यावरून आलो, काय हालत आहे रस्त्याची. इतकी वर्षे झाली रस्ता पूर्ण होत नाही. तर, ते म्हणाले कॉन्ट्रॅक्टर पळून गेले. ज्यांना आजपर्यंत निवडून दिलं, त्यांना एकदा तरी विचारलं का हे का पळून गेले म्हणून? रस्ते का होत नाही? यांचा फक्त मतदानाशी संबंध आहे. तोच समृद्धी महामार्ग बघा. नागपूर मुंबई, नाशिकपर्यंत आला, शिर्डीपर्यंत आला. सुरूही झाला. काळ काय, चार वर्षे. आमच्याकडे सोळा वर्षे कोकणातील रस्ता पूर्ण होत नाहीय. याचं कारण तुम्हाला गृहित धरलं आहे. कोण तुम्ही? मतदानाच्या दिवशी फक्त जिवंत राहा म्हणजे झालं. बाकी तुम्हाला मोजतंय कोण. अजूनही आम्ही आज त्याच त्याच गोष्टींवर बोलतोय. आम्हाला राग येत नाही", असं राज ठाकरे म्हणाले.

### बारसूमध्ये रिफायनरी का होऊ शकत नाही?

**बारसूमधील रिफायनरीवरून राज्यतलं राजकीय वातावरण तापलं आहे. सत्ताधारी हा प्रकल्प लावून धरत आहेत. तर विरोधक या प्रकल्पाला विरोध करत असतानाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी वेगळी आणि महत्त्वाची भूमिका मांडली आहे. राज ठाकरे म्हणाले, बारसूत असा प्रकल्प उभारता येणार नाही. यासाठी राज ठाकरे यांनी युनेस्को या जागतिक वारसा स्थळांचं संवर्धन करणाऱ्या संस्थेचा दाखला दिला.**

**राज ठाकरे म्हणाले, बारसूमध्ये कातळशिल्प सापडली आहेत. युनेस्को नावाची एक मोठी संस्था आहे, या संस्थेचे जगभरातल्या १९२ देशांबरोबर करार आहेत. यात भारताचा देखील समावेश आहे. भारताने देखील त्यांच्याबरोबर करार केलेला आहे. युनेस्को अंतर्गत येणाऱ्या अंजिठा, वेरुळची लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिन्स अशा अनेक वास्तू आहेत, या वास्तू युनेस्कोच्या अखत्यारित येतात. ही संस्था ठरवते की, या वास्तूंच्या आजूबाजूला कोणत्याही प्रकारची विकासकामं होणार की नाही. जिथे या प्रकारच्या हजारो वर्ष जुन्या वास्तू असतात, त्याच्या आजू-बाजूला तुम्हाला विकासकामं करता येत नाहीत. तरीदेखील आपल्याकडे लोक या आसपासच्या जमिनी विकून बसले आहेत.**

# मणिपूरमध्ये तणावपूर्ण शांतता!

## परिस्थिती पूर्वपदाकडे : हिंसाचाराचे 54 बळी

**।इम्फाळ। महाईन्यूज।**

**वांशिक हिंसाचारात होरपळून निघालेल्या मणिपूरमध्ये शनिवारी आणखी पाच जणांना गोळ्या घालण्यात आल्याने तेथील दंगलबळींची संख्या ५४ वर पोहोचली आहे. चुराचंदपूर या हिंसाचारग्रस्त जिल्ह्यात संरक्षण दलाचे जवान मैतेई नागरिकांना अन्यत्र स्थलांतरित करीत असताना दंगलखोरांनी चौघांना गोळ्या घालून ठार केले, तर आणखी एकाचा इम्फाळमध्ये मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.**



हिंसाचारग्रस्त भागातील सर्व महत्त्वाचे रस्ते आणि भागांमध्ये सुरक्षा दलाच्या जवानांची गस्त असल्याने तेथे शनिवारी तणावपूर्ण शांतता होती. चुराचंदपूर जिल्ह्यात शुक्रवारी रात्री दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच बंडखोर ठार झाले, तर इंडिया रिझर्व्ह बटालियनचे दोन जवान जखमी झाले, असे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, इम्फाळ खोऱ्यातील जनजीवन शनिवारी काहीसे सुरळीत झाल्याचे दिसत होते. दुकाने पुन्हा उघडली होती. बाजारपेठांमधील वर्दळ वाढली होती. रस्त्यांवर वाहनेही धावताना दिसत होती. हिंसाचारात बळी गेलेल्यांची संख्या ५४ झाल्याची माहिती सरकारी अधिकारी देत असले तरी अनधिकृत सूत्रांच्या मते ही संख्या याहून अधिक असल्याचा दावा करण्यात येत आहे. तर हिंसाचारात जखमी झालेल्या दीडशेहून अधिक लोकांवर उपचार सुरू आहेत.

हिंसाचारग्रस्त भागातील सर्व महत्त्वाचे रस्ते आणि भागांमध्ये सुरक्षा दलाच्या जवानांची गस्त असल्याने तेथे शनिवारी तणावपूर्ण शांतता होती. मणिपूरमधून बाहेर पडण्यासाठी विद्यार्थ्यांसह लोक मोठ्या संख्येत इम्फाळ विमानतळावर जमले होते.

राज्यात बहुसंख्याक असलेल्या मैतेइ समुदायाला अनुसूचित जातीचा दर्जा देण्याच्या निर्णयाविरुद्ध कुकी आणि नागा या आदिवासी जमातींनी आंदोलन केल्यानंतर हिंसाचार उसळला. त्यानंतर राज्यात लष्कर, निमलष्करी दल आणि केंद्रीय पोलीस दल यांचे मिळून सुमारे १० हजार जवान तैनात करण्यात आले आहेत.

### 13 हजार नागरिक सुरक्षितस्थळी

» आतापर्यंत एकूण १३ हजार लोकांची सुटका करून त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. लष्कराने चुराचंदपूर, मोरे, काकचिंग आणि कांगपोक्पी जिल्हे आपल्या संपूर्ण नियंत्रणाखाली आणले आहेत. काही नागरिकांना लष्करी तळांवर आश्रय देण्यात आला आहे.

## भाजपपासून सुटकेनंतरच कर्नाटकची प्रगती : सोनिया गांधी

**।हुबळी। महाईन्यूज।**

सत्ताधारी पक्षाच्या 'लूट, असत्य, अहंकार आणि द्वेष' यांच्यापासून सुटका मिळवल्याशिवाय कर्नाटक आणि पर्यायाने भारत प्रगती करू शकत नाही, अशा शब्दांत काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांनी शनिवारी भाजपवर हल्ला चढवला. आपला मुलगा राहुल गांधी याच्या नेतृत्वाखालील भारत जोडो यात्रा द्वेष पसरवणाऱ्यांच्या विरोधात होती. त्यामुळेच लाखो लोक चार हजार किलोमीटरच्या या यात्रेत सामील झाले, असे कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी घेतलेल्या पहिल्याच प्रचारसभेत सोनिया यांनी सांगितले.

"भाजप सरकारच्या 'काळ्या राजवटीविरुद्ध' आवाज उठवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे", असेही सोनिया म्हणाल्या. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, तसेच तिकीट नाकारल्यामुळे भाजप सोडून अलीकडेच काँग्रेसमध्ये आलेले राज्याचे माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर हे सभेत उपस्थित होते.सहा वेळा आमदार राहिलेले शेट्टर यांना काँग्रेसने हुबळी- धारवाड मतदारसंघातून उमेदवारी दिले आहे. २०१८ साली त्यांनी येथूनच विधानसभा निवडणूक जिंकली होती.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व



माजी केंद्रीय मंत्री पी. चिदम्बरम यांनी शनिवारी मणिपूरमधील हिंसाचाराचा संदर्भ देत कर्नाटकातील मतदारांनी 'डबल इंजिन' सरकारच्या खोट्या आश्वासनांपासून सावध रहावे, असा इशारा समाजमाध्यमातून दिला आहे. मणिपूरमधील आदिवासी आणि बहुसंख्य मैतेई समाजातील हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर चिदम्बरम यांनी हा इशारा दिला आहे. संघर्षामुळे नऊ हजारांहून अधिक लोक त्यांच्या गावांतून विस्थापित झाले आहेत. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या हत्येचा कट भाजपकडून रचण्यात आला असून त्यासंबंधीची ध्वनिफीत काँग्रेसला मिळाली आह असा आरोप पक्षाने केला आहे. दरम्यान, या प्रकरणी चौकशी करून कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी स्पष्ट केले आहे. काँग्रेसचे नेते रणदीप सुरजेवाली यांनी येथील पत्रकार परिषदेत दावा केला की, खरगे यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांनाही ठार करण्याचा कट भाजपच्या नेत्यांकडून रचला जात आहे.

## शाही सोहळ्यात चार्ल्स तृतीय यांचा राज्याभिषेक

### राणी एलिझाबेथ यांच्या 70 वर्षपूर्वी आठवणी जाग्या

**।लंडन। महाईन्यूज।**

**लंडनमधील वेस्टमिन्स्टर ॲबेमध्ये शनिवारी झालेल्या भव्य कार्यक्रमात राजे चार्ल्स तृतीय यांचा ब्रिटनचे चाळिसावे राजे म्हणून संगीतमय वातावरणात थाटामाटात राज्याभिषेक करण्यात आला. पावसाळी वातावरणात झालेल्या या कार्यक्रमामुळे, चार्ल्स यांच्या मातोश्री, राणी एलिझाबेथ यांच्या ७० वर्षांपूर्वी झालेल्या राज्याभिषेकाच्या आठवणी जाग्या झाल्या.**



'गॉड सेव्ह दि किंग'चा उद्‌घोष, चर्चच्या घंटा आणि ट्रम्पेट वाजत असताना ७४ वर्षे वयाचे नवे सम्राट चार्ल्स यांना ३६० वर्षे जुना 'सेंट एडवर्डस क्राऊन' हा मुकुट घालण्यात आला. राजे चार्ल्स व राणी कॅमिला हे नंतर पारंपरिक पोशाख परिधान करून बकिंगहॅम राजवाड्याच्या सज्ज्यात आले. त्यांच्या सोबत राजपुत्र व राजपुत्री वेल्स, विल्यम व केट आणि मोजके राजनिष्ठ लोक होते. नव्याने अनभिषिक्त सम्राट- सम्राज्ञीची झलक पाहण्यासाठी पावसाची पर्वा न करता अनेक तास वाट पाहात थांबलेल्या हजारो नागरिकांना या सर्वांनी अभिवादन केले. या ऐतिहासिक सोहळ्याचा भव्य समारोप रॉयल एअर फोर्सच्या फ्लायपास्टने करण्याचे नियोजन होते, मात्र सर्द वातावरणामुळे हा कार्यक्रम आटोपण्यात आला.

### प्रतीकात्मक पुनर्विवाह

» **यापूर्वी, जवळजवळ एक हजार वर्षांची परंपरा असलेला दोन तासांचा धार्मिक समारंभ पावित्र्य राखून साजरा करण्यात आला. राजे चार्ल्स यांनी आर्चबिशप ऑफ कँटरबरी यांच्यासमोर 'सेवेची शपथ' (ओथ ऑफ सर्व्हिस) घेतली. या पवित्र समारंभाचा भाग म्हणून चार्ल्स व कॅमिला यांनी प्रतीकात्मक पुनर्विवाह केला. मे १९३७ मध्ये राजे पाचवे जॉर्ज व राणी एलिझाबेथ यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी वापरल्या गेलेल्या खुर्च्याच याही राज्याभिषेकासाठी वापरण्यात आल्या. ब्रिटनमधील आतापर्यंतचे सर्व राज्याभिषेक सोहळे वेस्टमिन्स्टर ॲबेमध्येच झाले आहेत.**

## माझं लग्न एकदा नाही,चक्क ३ वेळा...', सुश्मिता सेनचा लग्नाविषयी मोठा खुलासा

सुश्मिता सेन(४६ वर्षांची आहे. तिनं अद्याप लग्न केलेलं नाही,परंतु आपल्या दोन दत्तक मुली रेने आणि अलिशाला घडवण्यात मात्र ती कुठेच मागे राहिलेली नाही. दोन मुली हेच तिचं आयुष्य बनलंय. कितीतरी वेळा म्हटलं जातं की या मुलींमुळेच तिनं लग्न केलेलं नाही. पण यावेळी याविषयावर सुश्मिता सेननं चुप्पी तोडत लग्न न करण्याविषयी मोठा खुलासा केला आहे. अभिनेत्री म्हणाली,"तीन वेळा असं झालंय की जवळ-जवळ लग्नाची सगळी तयारी झाली,आता लग्न होणारंच त्यावेळी असं काही घडलं की माझं नववधू बनायचं स्वप्न तिथेच मोडायचं". पण यासाठी माझ्या मुली नक्कीच कारणीभूत नाहीत.

मिस.युनिव्हर्स १९९४ सुष्मिता सेननं स्पष्ट म्हटलं आहे की,तिच्या मुली रेने सेन आणि अलिशा या तिच्या अविवाहीत राहण्याचं कारण कधीच नव्हत्या. माझ्या आयुष्यात तब्बल तीन वेळा लग्न करण्याचे प्रसंग आले पण देवानं मला वाचवलं असं मी म्हणेन.



## '..तर मला राजकारणात प्रवेश करायला आवडेल'; कंगना रानौतचं विधान चर्चेत

मुंबई : बॉलिवूडची अभिनेत्री कंगना रानौत आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे कायम चर्चेत असते. एका खासगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत तिने राजकारणात येण्यासंदर्भात भाष्य केलं आहे. देशाला माझी गरज असेल तर मला राजकारणात प्रवेश करायला आवडेल, अशी इच्छा तिने व्यक्त केली आहे.

कंगना रणौत म्हणाली की, मला सुरूवातीपासूनच समाज कार्य करायला आवडते. तसाच मला राजकारणाची देखील आवडत आहे. यामुळे जर मला राजकीय कोणत्याही पक्षाने संधी दिली तर मी राजकारणात प्रवेश करेल. याचप्रमाणे देशाचा विचार करून देशाला गरज असेल तर मला राजकारणात प्रवेश करायला आवडेल. तसंच मी राजकारणात काम करण्यासाठी पात्र आहे की नाही हे जनता ठरवेल. पण मी अभिनय आणि राजकीय क्षेत्रात झोकून काम करेल. मला अनेक लोक चुकीच समजतात. काहीह बोलते म्हणतात. परंतु मी कोणत्याही व्यक्तीची बाजू घेत



## गायिका वैशाली सामंतची लगीनघाई?



आपल्या सुमधुर स्वरांनी असंख्य सुपरहीट गाणी देणारी आघाडीची गायिका वैशाली सामंतची( सध्या लगीनघाई सुरु आहे. तुम्हाला ही प्रश्न पडला असेलच ना!! ही लगीनघाई नेमकी कोणाची आहे? तर वैशालीची ही लगीनघाई 'कन्याकुमारी'च्या लग्नासाठी आहे. व्हिडिओ पॅलेस प्रस्तुत 'कन्याकुमारी' या सोलो अल्बमसाठी वैशाली हिने आपला स्वरसाज दिला आहे. लवकरच हा अल्बम प्रकाशित केला जाणार आहे. अभिनेत्री दिशा परदेशी आणि अभिनेता अक्षय वाघमारे यांच्यावर हे गाणं चित्रीत करण्यात आलं आहे. कन्याकुमा री'च्या लग्नातील धमाल-मस्ती सोबतच नववधूच्या मनातील हुरहुर, जोडीदाराची ओढ तसेच लग्नाचा माहोल, पाहुण्यांची लगबग या गाण्यातून छानपणे व्यक्त करण्यात आली आहे. मंदार चोळकर व मिताली जोशी यांनी लिहिलेल्या या गीताला वैशाली सामंत हिने आपल्या मधुर स्वरांनी चारचाँद लावले असून चिनार-महेश यांनी ते संगीतबद्ध केलं आहे. नृत्यदिग्दर्शिका फुलवा खामकर हिचे नृत्यदिग्दर्शन या गाण्याला लाभले असून अमोल गोळेच्या छायांकनाने हे गाणं सजलं आहे.

## मल्टीस्टारर धमाल कॉमेडी "सासूबाई जोरात'26 मे पासून संपूर्ण महाराष्ट्रात

### संदीप पाठक, सयाजी शिंदे, मोहन जोशी, विजय पाटकर यांच्या प्रमुख भूमिका




सासू-सुनेचं नातं विळ्याभोपळ्यासारखं असतं. पण सासू आणि जावयाच्या धमाल नात्याचं चित्रण सासूबाई जोरात या चित्रपटात करण्यात आलं आहे. सिद्धार्थ प्रभाकर ढगे यांनी लेखन-दिग्दर्शन केलेला आणि दमदार स्टारकास्ट असलेला हा चित्रपट २६ मे रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

प्रभू शांती फिल्म प्रॉडक्शननं "सासूबाई जोरात" हा चित्रपट प्रस्तुत केला आहे. सिद्धार्थ प्रभाकर ढगे यांनी या चित्रपटाच्या लेखन, दिग्दर्शन, गीतलेखन आणि निर्मितीची धुरा सांभाळली आहे. तर तेजस काळोखे यांनी संगीत, कुमार डोंगरे यांनी छायांकन केलं आहे. चित्रपटात सयाजी शिंदे, संदीप पाठक, विजय पाटकर, मोहन जोशी, सुनील गोडबोले, उषा नाईक, आशा बिराजदार, विधी कुडिया, सिमरन क्षीरसागर, मिलिंद ढगे, सुयश लातूरे आदींच्या प्रमुख भूमिका आहेत. "सासुबाई जोरात" ही गोष्ट आहे आधुनिक सासू आणि तिच्या आधुनिक जावयाची. या सासूला तिच्या नवऱ्याचीही चिंता नाही. त्याशिवाय ती जावयाशीही अत्यंत कठोरपणे वागते. या सासू आणि जावई यांच्यात काय होतं याची धमाल गोष्ट सासूबाई जोरात या चित्रपटात मांडण्यात आली आहे. त्यामुळे सासू-सुनेच्या अनेक प्रकारच्या लढाया आजवर चित्रपट मालिकांतून पाहिल्यानंतर आता सासु-जावयाची धमाल गोष्ट चित्रपटात पाहणं हा मनोरंजक अनुभव ठरेल यात शंकाच नाही. त्याशिवाय चित्रपटात उत्तम स्टारकास्ट असल्यानं हा चित्रपट अभिनयाची मेजवानीच ठरेल.

## मेहबूबा गेली कुठं?मल्लिकाची एंट्री, नेटकरी घायाळ

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री मल्लिका शेरावतचा चाहतावर्ग मोठा आहे. ती तिच्या बोल्डनेसमुळे नेहमीच चर्चेत असणाऱ्या मल्लिकाच्या आगामी चित्रपटाचा ट्रेलर व्हायरल झाला आहे. आणि तो चर्चेतही (SOCIAL MEDIA VIRAL NEWS) आला आहे. बऱ्याच कालावधीनंतर मल्लिका चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर येत आहे. रजत कपूरचा मल्लिका शेरावत अभिनित RK/RKAY, हा चित्रपट 22 जुलै ला सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होण्यास पूर्णपणे सज्ज असून त्यापूर्वीच हा कॉमेडीपट शांघाय इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, फ्लॉरेन्समधील रिव्हर टू रिव्हर यासह ऑस्टिन फिल्म फेस्टिव्हल आणि पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल अशा अनेक आंतरराष्ट्रीय फेस्टिव्हल्समध्ये गाजला आहे. मल्लिकाच्या सस्पेन्सने भरलेल्या आगामी चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित, पाहायला मिळाली निगेटिवमधून नायकाच्या गायब होण्याची अनोखी कहाणी ही आगामी भारतीय चित्रपट निर्मितीतील विनोदी ही एक कथा आहे. ही कथा प्रेक्षकांना चित्रपट जगतामागील रहस्यात घेऊन जाते. प्रेक्षकांना सस्पेन्ससह चित्रपट पाहण्यास भाग पाडणारा त्याचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये असे दाखवण्यात आले आहे की हा चित्रपट एका चिंतीत दिग्दर्शकाच्या (आरके) एका वेधक कथेभोवती फिरतो ज्याने नुकतेच त्याच्या नवीन चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले आहे, परंतु या कथेला नवे वळण मिळते जेव्हा त्याला एडिटिंग रूममधून फोन येतो की, नेगटीव्हमधून नायक गायब झाला आहे. चित्रपटाची कथा पुढे सिनेजगतातील पडद्यामागील जगाचा वेध घेत ज्यात आरके आणि त्याची टीम नायकाचा शोध घेताना दिसतात.



# आरसीबीच्या सामन्यात पुन्हा राडा!

## सिराज एकटाच दोघांशी भिडला




। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**मोहम्मद सिराजचं चाललंय तरी काय हा प्रश्न आता सर्वांना पडला असेल. कारण गेल्या सामन्यातही त्याने वाद केला होता. आता तर सिराज चक्क डेव्हिड वॉर्नरशी भिडल्याचे पाहायला मिळाले. या गोष्टीचा व्हिडिओ आता चांगलाच व्हायरल झाला आहे..**

### आरसीबीच्या विजयात मिठाचा खडा

फिल सॉल्टमुळे यावेळी आरसीबीच्या विजयात मिठाचा खडा पडल्याचे पाहायला मिळाले. कारण सॉल्टने एकाकी झुंज देत हा सामना दिल्लीला जिंकवून दिला. दुसरीकडे या सामन्यानंतर मात्र आयपीएलच्या गुणतालिकेत मोठा बदल झाला आहे. बंगळुरुने या लढतीपूर्वी ९ सामने खेळले होते. त्यावेळी ९ पैकी ५ मध्ये विजय मिळवले होते. १० गुणांसह ते गुणतक्त्यात पाचव्या स्थानावर होते. त्यामुळे आज आरसीबीने दिल्लीवर विजय मिळवल्यास १२ गुणांसह ते तिसऱ्या क्रमांकावर पोहोचू शकत होती. त्यामुळे या सामन्यात आता आरसीबीचा संघ विजय मिळवतो का, याची उत्सुकता सर्वांना होती. पण तसे घडले नाही. कारण आरसीबीच्या संघाला यावेळी दिल्लीकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे त्यांना एकही गुण कमावता आला नाही. दुसरीकडे हा सामना दिल्लीने जिंकला. दिल्लीने या सामन्यापूर्वी ९ पैकी तीन सामने जिंकले होते आणि सहा गुणांसह ते दहाव्या स्थानावर होते. पण दिल्लीने या सामन्यात विजय मिळवला आणि त्यांनी आठ गुणांसह अखेरचे स्थान सोडले आहे. आता ते गुणतालिकेत ९ व्या स्थानावर आले आहेत.

ही गोष्ट घडली ती पाचव्या षटकात. त्यावेळी सिराज गोलंदाजी करत होता आणि दिल्लीचा फिल सॉल्ट हा फलंदाज करत होता. त्यावेळी सॉल्टने पहिल्या चेंडूवर षटकार खेचला. त्यानंतर सिराजच्या दुसऱ्या चेंडूवरही सॉल्टने षटकार लगावला. सिराजने तावाताने त्यानंतर तिसरा चेंडू टाकला. त्यावेळी सॉल्टने चौकार मारला. सिराजच्या तिन्ही चेंडूवर सॉल्टने मोठे फटके मारले होते. सिराज यावेळी चांगलाच भडकला होता. चौथा चेंडू टाकण्यासाठी सिराज सज्ज होता. सिराजने चेंडू टाकला आणि त्यावेळी सॉल्टने पंचांना हा चेंडू वाईड देण्याचा इशारा केला. त्यावेळी सिराज हा सॉल्टवर चांगलाच भडकला आणि त्याने तु तुझं काम कर, पंचांना त्याचं काम करू दे ... असं म्हणाला. त्यानंतर या दोघांमध्ये थोडा वाद रंगला. त्यावेळी दिल्लीचा कर्णधार डेव्हिड वॉर्नरही तिथेच होता. वॉर्नर सिराजशी बोलायला गेला. त्यानंतर सिराज वॉर्नरबरोबरही भिडल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे आता मैदानात मोठा राडा होणार, असे वाटत होते. पण त्यावेळी पंच आले आणि त्यांनी हे भांडण मिटवले, नाही तर पुन्हा एकदा मैदानात आरसीबीचा राडा पाहायला मिळाला असता. या सामन्यात जे काही घडलं त्याचा व्हिडिओ आता चांगलाच व्हायरल झाल्याचे पाहायला मिळत आहे.

आरसीबी आणि राडा, हे समीकरण आता होत चालले आहे. कारण आरसीबीचा संघ मैदानात असला की राडा होतोच, असे आता पाहायला मिळत आहे. त्यामुळे आता चाहतेही त्यांच्यावर वैतागल्याचे पाहायला मिळत आहे. कारण जर प्रत्येक सामन्यात असे होत असेल तर चाहत्यांच्याही ते पचनी पडणार नाही. त्यामुळे आता चाहते या सामन्यानंतर पुन्हा एकदा आरसीबीला ट्रोल करत आहेत.

विराट कोहली आणि फॅफ ड्यु प्लेसिस यांनी यावेळी आरसीबीला झोकात सुरुवात करून दिली. कारण या दोघांनी यावेळी १० षटकांमध्ये ८२ धावांची सलामी दिली होती. पण ११ व्या षटकात मात्र फॅफ बाद झाला आणि आरसीबीला पहिला धक्का बसला. फॅफचे अर्धशतक यावेळी पाच धावांनी हुकले. पण यावेळी कोहलीने मात्र आपले अर्धशतक पूर्ण केले. कोहलीने या सामन्यात दमदार अर्धशतक झळकावले आणि सात हजार धावांचा पल्ला गाठला. आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात अशी कामगिरी करणारा तो पहिला फलंदाज ठरला. कारण आतापर्यंत आयपीएलमध्ये सात हजार धावांचा टप्पा कोणत्याही फलंदाजाला गाठता आलेला नाही. विराटने आयपीएलमध्ये यापूर्वी ५ शतकं आणि ४९ अर्धशतकं केली होती आणि या सामन्यातर त्याने अर्धशतकांचे अर्धशतक साजरे केले. कारण कोहलीचे हे ५० वे अर्धशतक ठरले. आयपीएलच्या १६व्या हंगामात विराट शानदार फॉर्ममध्ये आहे. सर्वाधिक धावा करणाऱ्या आघाडीच्या पाच फलंदाजांमध्ये तो येतो.

# दिल्ली नडला आणि इतिहास रचला

## एकाही खेळाडूला विराट कोहलीसारखी गोष्ट करता आली नाही

। नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**विराट कोहलीने आता एक नवा इतिहास रचला आहे. दिल्लीतील सामन्यात तो एकटाच दिल्ली कॅपिटल्सच्या संघाला नडला आणि त्याचबरोबर त्याने इतिहासही रचला आहे. कारण आयपीएलमध्ये अशसी कामगिरी आतापर्यंत कोणालाही करता आलेली नाही..**




कोहलीने यावेळा आरसीबीचा डाव सावरल्याचे पाहायला मिळाले. आरसीबीच्या या माजी कर्णधारने आयपीएलमध्ये या सामन्यापूर्वी ६ हजार ९८८ धावा केल्या होत्या. जर विराटने १२ धावा केल्यास तो ७ हजार धावांचा टप्पा पार करणार होता. कोहलीने या सामन्यात दमदार अर्धशतक झळकावले आणि सात हजार धावांचा पल्ला गाठला. आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात अशी कामगिरी करणारा तो पहिला फलंदाज ठरला. कारण आतापर्यंत आयपीएलमध्ये सात हजार धावांचा टप्पा कोणत्याही फलंदाजाला गाठता आलेला नाही. विराटने आयपीएलमध्ये यापूर्वी ५ शतकं आणि ४९ अर्धशतकं केली होती आणि या सामन्यातर त्याने अर्धशतकांचे अर्धशतक साजरे केले. कारण कोहलीचे हे ५० वे अर्धशतक ठरले. आयपीएलच्या १६व्या हंगामात विराट शानदार फॉर्ममध्ये आहे. सर्वाधिक धावा करणाऱ्या आघाडीच्या पाच फलंदाजांमध्ये तो येतो. आतापर्यंत झालेल्या ९ मॅचमध्ये एकदा नाबाद राहत त्याने ३६४ धावा केल्या आहेत. या हंगामात त्याने ५ अर्धशतकं केली असून यात ३३ चौकार आणि ११ षटकार मारले आहेत. या शानदार कामगिरी सोबत विराट कोहली वादामुळे देखील चर्चेत आला आहे. लखनौ सुपर जायंटस विरुद्धच्या लढतीत विराट आणि नवीन उल हक व कोच गौतम गंभीर यांच्या सोबत वाद झाला होता. या वादानंतर विराटवर दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर कोहलीने बीसीसीआयला एक पत्रही लिहिले आहे.

# पराभवानंतर मुंबई इंडियन्सला बसला अजून एक मोठा धक्का

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



मुंबई इंडियन्सचा चेन्नईकडून मानहानीकारक पराभव झाला. हा पराभव मुंबईच्या चाहत्यांच्या नक्कीच जिव्हारी लागला असेल. पण या पराभवानंतर मुंबईच्या संघाला आता अजून एक वाईट बातमी मिळाली आहे.

मुंबई इंडियन्सच्या संघाने आपल्या फलंदाजीत यावेळी काही मोठे प्रयोग केले आणि त्याचा फटका त्यांना बसला. मुंबईला या सामन्यात मोठी धावसंख्या उभारता आली नाही. कारण मुंबईच्या डावाची सुरुवातच चांगली झाली नाही. मुंबईच्या संघाने यावेळी कॅमेरून ग्रीनला सलामीला पाठवण्याचा प्रयोग केला आणि तो फसला. कारण ग्रीन हा लवकर बाद झाला आणि त्यानंतर रोहित शर्माला तर भोपळाही फोडता आला नाही. त्यामुळे मुंबई इंडियन्सचा हा प्रयोग फसल्याचे यावेळी पाहायला मिळाले. मुंबईला यावेळी १४० धावाच करता आल्या आणि या कमी धावांमुळेच त्यांचा पराभव झाला. पण या पराभवानंतर त्यांना आता एक मोठा धक्का बसला आहे. मुंबईने यापूर्वी चेन्नईचे मैदान चांगलेच गाजवले होते. कारण चेन्नईच्या मैदानात गेल्या सहा सामन्यांमध्ये त्यांनी एकही पराभव पाहिलेला नव्हता. त्यामुळे या सामन्यासाठी मुंबईचा संघ हा फेव्हरेट समजला जात होता. पण मुंबईच्या संघाला यावेळी लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही आणि त्यामुळे त्यांचा पराभव झाला. या पराभवानंतर मुंबईची चेन्नईच्या मैदानातील विजयी साखळी आता तुटली आहे आणि हा त्यांच्यासाठी मोठा धक्का असेल.